**OFFICE OF THE DEPUTY CONSERVATOR OF FORESTS,JAWHAR FOREST DIVISION**
Opp.Rajiv Gandhi Stadium Jawhar Dist-Palghar
Tel.- 02520-222252 Fax- 02520-222166
E-mail:- dycfjawhar@gmail.com

महाराष्ट्र वन विभाग

**उप वनसंरक्षक**
**जव्हार वन विभाग, जव्हार यांचे कार्यालय**
राजीव गांधी स्टेडीयम समोर,जव्हार जि.पालघर
दुरध्वनी क्र.०२५२०-२२२२५२,फॅक्स-०२५२०-२२२१६६
ई-मेल:- dycfjawhar@gmail.com

**पत्र**

उप वनसंरक्षक, डहाणू वनविभाग, डहाणू यांचे कार्यालय
कक्षाचे नांव [illegible]
आवक क्र. [illegible]
28 APR 2023
कार्यालय अधिक्षक
उप वनसंरक्षक
डहाणू वनविभाग, डहाणू

**विषय:-** तारापूर-बोरीवली आणि बोईसर-घोडबंदर ट्रान्समिशन लाईनच्या कामासाठी १०.३३९१ हे. वनजमीन वळती करणेबाबत..

जा.क्र. ब-२०/जमीन/ ९२९ /२०२३-२४
जव्हार ४०१ ६०१ दिनांक ९८/०४/२०२३

प्रति,
उपवनसंरक्षक
डहाणू, वनविभाग डहाणू

**संदर्भ:-** आपलेकडील पत्र क्र. ब/२०/जमिन/४३४२, दिनांक २३/०३/२०२३

विषयांकित तारापूर-बोरीवली आणि बोईसर-घोडबंदर ट्रान्समिशन लाईनच्या कामासाठी १०.३३९१ हे. वनजमीन वळती करणेबाबत सादर करणेत आलेला प्रस्ताव शासन स्तरावर असून, सदर प्रस्तावाप्रकरणी दिनांक १४/०२/२०२३ रोजी मा. प्रधान सचिव (वने) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्ही. सी. मध्ये खालीलप्रमाणे त्रुटी उपस्थित केलेबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविणेत येऊन त्रुटींच्या अनुषंगाने क्षेत्र तपशिलानुसार गाव व सर्व्हे नंबर निहाय पुर्तता अहवाल सादर करणेबाबत कळविणेत आले आहे.

" *काही ७/१२ उताऱ्यांवर खाजगी व्यक्तींची नावे असून कुळ कायद्याने प्राप्त जमीन, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम ३६ व ३६ अ अंतर्गत हस्तांतरण बंदी. नवीन अविभाज्य शर्तीवर. आदिवासी खातेदार असे शेरे आहेत.* "

उक्त वनजमीन वळतीकरण प्रस्तावामध्ये जव्हार वनविभागाकडील पाच वेगवेगळ्या गावांमधील एकूण ६.१९९४ हे. वनक्षेत्र बाधीत होत असून सदर क्षेत्राचा गाव व सर्व्हे नंबर निहाय तपशिल खालीलप्रमाणे देणेत येत आहेत.

| अ. क्र. | गाव | सर्व्हे नंबर | गट नंबर | क्षेत्र हेक्टर | वनक्षेत्राचा प्रकार | अधिसुचना क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोंढले | | २०३ पै | १.३४०५ | ३५ सेक्शन (मानीव राखीव वनाचे क्षेत्र) | नोटीस क्र. WT/८A, दि. ३१/०५/१९५६ |
| २ | लोहपे | | ८३/१० | ०.१२०८ | संरक्षित वन | १५५५ (क),दि. ०२ मार्च १९०५ |
| | | | ५२ | ०.५१४५ | वनसंज्ञा | - |
| | | | १० | ०.४८३० | वनसंज्ञा | - |
| ३ | केलठण | १७६ | १५४ | ०.५४२५ | संरक्षित वन | १५५५ (क),दि. ०२ मार्च १९०५ |
| | | | १५५ | ०.४२८८ | संरक्षित वन | १५५५ (क),दि. ०२ मार्च १९०५ |
| | | १७३ | ५०७ | ०.०४४२ | संरक्षित वन | १५५५ (क),दि. ०२ मार्च १९०५ |
| | | | ५१२ | ०.०१०७ | संरक्षित वन | १५५५ (क),दि. ०२ मार्च १९०५ |
| | | | ५१३ | ०.१०३९ | संरक्षित वन | १५५५ (क),दि. ०२ मार्च १९०५ |
| | | | ५१४ | ०.२८५८ | संरक्षित वन | १५५५ (क),दि. ०२ मार्च १९०५ |
| | | | ५१५ | ०.१६५६ | संरक्षित वन | १५५५ (क),दि. ०२ मार्च १९०५ |
| ४ | गोराड | ६१ | १६१ | ०.५६३५ | संरक्षित वन | १५५५ (क),दि. ०२ मार्च १९०५ |
| | | | १३१ | ०.४५८२ | संरक्षित वन | १५५५ (क),दि. ०२ मार्च १९०५ |
| ५ | निबंवली | ५५/१ | ३२५ | १.१३७५ | संरक्षित वन | १५५५ (क),दि. ०२ मार्च १९०५ |
| एकुण | | | | ६.१९९४ | - | - |

२.०० वरीलप्रमाणे मौजे कोंढले येथील पुर्वीचे इनाम गावाचे १४२५ एकर (चतुसिमा- उत्तरेस देवगांव इनाम गावाची सिमा, पुर्वेस म्हसवळ गावाची सिमा, दक्षिणेसर राखीव वन स. नं. ६५ व पश्चिमेस राखीव वन स. नं. ५५ आणि उसर गावाची सिमा) अनसर्व्हेड क्षेत्रास नोटीस क्र. WT/८A, दि. ३१/०५/१९५६ नुसार भारतीय वनअधिनियम १९२७ चे कलम ३५ (३) नुसार नोटीस लागलेली आहे (सोबत छायांकित प्रत जोडणेत येत आहे). सदर खाजगी वनाच्या तरतुदी लागू असलेले १४२५ एकर क्षेत्राची निश्चिती आजमितीस झालेली नसल्याकारणाने महसुली अभिलेखा (७/१२) सदरी खाजगी वनासंबंधीच्या नोंदी घेतलेल्या नसून, मौजे कोंढले येथील ७/१२ उताऱ्यांवर पुर्वापार हक्क असलेल्या संबंधित खातेदारांचे भोगवटादार सदरी नावे नोंद आहेत. मात्र सदर क्षेत्र हे उपरोक्त नमुद चतुसिमेमध्ये येत असल्याने, तसेच सदर क्षेत्रास भारतीय वनअधिनियम १९२७ चे कलम ३५ च्या तरतुदी लागु असून, सदर क्षेत्र महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम १९७५ मधील तरतुदीनुसार मानीव राखीव वन या दर्जाचे असल्याने सदर क्षेत्रामध्ये वनेतर कामे करणेकरीता केंद्र शासनाची मंजुरी आवश्यक आहे. तरी सदर क्षेत्र प्रस्तावामध्ये अंतर्भुत करणेत येऊन त्याअनुषंगाने ७/१२ उतारे प्रस्तावासोबत सादर करणेत आलेले आहेत.

त्याचप्रमाणे प्रस्तावामध्ये बाधीत होत असलेले वरीलप्रमाणे नमुद मौजे लोहपे स. नं. ८३/१०, केळठण स. नं. १७३ व १७६, गोराड स. नं. ६१ व ६२, निंबवली स. नं. ५५/१ चे क्षेत्र हे या वनविभागाकडील नमुना नं. १ नुसार संरक्षित वनाचे क्षेत्र असून, सदर स. न. चे क्षेत्र संरक्षित वन घोषित झालेबाबत शासन अधिसुचनेच्या छायांकित प्रती अवलोकनार्थ यासोबत जोडणेत येत आहेत. व त्याअनुषंगाने सदर क्षेत्रामध्ये वनेतर कामे करणेकरीता वनसंवर्धन अधिनियम १९८० चे कलम २ नुसार केंद्र शासनाची परवानगी आवश्यक असल्याने, सदर क्षेत्र प्रस्तावामध्ये अंतर्भुत करणेत येऊन, सद्यस्थितीचे ७/१२ उतारे प्रस्तावासोबत सादर करणेत आलेले आहेत. तथापि सदर क्षेत्राचे ७/१२ सदरी घेणेत आलेल्या नोंदी ह्या महसूल विभागाकडून कोणत्या आधारे घेण्यात आलेल्या आहेत याबाबत दस्तऐवज या कार्यालयातील अभिलेखामध्ये मिळून येत नसून, सदरच्या नोंदीबाबत सविस्तर तपशिल महसूल विभागाकडून प्राप्त करुन उपलब्ध करुन देणेबाबत प्रकल्प यंत्रणेस याच पत्राद्वारे अवगत करणेत येत आहे.

वरीलप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक अहवाल सस्नेह अग्रेषित करणेत येत आहे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

( एन. एस. दिवाकर)
उप वनसंरक्षक
जव्हार वनविभाग, जव्हार

**प्रतः-** अधिक्षक अभियंता , अति उच्च दाब प्रकल्प, म.रा.वि.पा.कं. मर्यादित, कळवा यांना माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२.०० प्रस्तुत प्रकरणी जव्हार वनविभागाकडील वळते करावयाचे क्षेत्राबाबत महसूल विभागाशी संपर्क करुन उपरोक्त नमुद क्षेत्रामध्ये ७/१२ घेणेत आलेल्या नोंदीबाबत सविस्तर वस्तुस्थितीदर्शक अहवाल आवश्यक त्या अभिलेखांसह उपलब्ध करुन देणेची कार्यवाही करावी.